मुंबई विद्यापीठ
विद्यार्थी कल्याण विभाग

क.वि.क/०२/२०१३

डॉ. मृदुल निळे
संचालक

विद्यापीठ विद्यार्थी भवन
'बी' रोड, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०

परिपत्रक ः

विषय ः विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक ९८७२८
संदर्भ ः आपले पत्र क. विसप्र ०३१३/(१०१/१३)/म.शि.३, दिनांक २२ मार्च,२०१३

महोदय/महोदया,

उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय, यांचे उपरोक्त संदर्भाधिन पत्रानुसार उलट टपाली आणि ई-मेल द्वारे (deptstudentswelfare@gmail.com) खालिल प्रश्नांवाबत खुलासा करण्याची विनंती आहे.

प्रश्न १.ः मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर काही बडया महाविद्यालयांनी सुरक्षेसाठी बाहेरून सुरक्षारक्षक नेमण्यापासून सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला असतांना केवळ युजीसीचा निधी बंद झाल्यामुळे सदर प्रकल्प रखडला आहे, हे खरे आहे काय?

प्रश्न २.ः असल्यास, युजीसीने महाविद्यालयाचा निधी बंद करण्याची कारणे काय आहेत,

प्रश्न ३.ः असल्यास, महाविद्यालयातील वाढत चाललेले दुदैवी प्रसंग टाळण्यासाठी महाविद्यालयांनी आपल्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची गरज लक्षात घेता युजीसीने तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, वा येत आहे.

प्रश्न ४.ः नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

तरी वरील प्रश्नाच्या अनुषगांने आपला खुलासा विद्यापीठ विद्यार्थी कल्याण विभागाकडे सादर करावा जेणे करून सदर माहिती शासनास तात्काळ कळविता येईल.

(डॉ. मृदुल निळे)
संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग

दिनांक ः १० एप्रिल,२०१३.

प्रत रवाना ः प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, संचालक/ विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ यांच्या माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.